क्र. साप्रवि/सामान्य/ No 1720
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड
माटुंगा, मुंबई-४०००१९.
दिनांक :- 10 JUN 1999

# "परिपत्रक"

विषय :- कर्मचाऱ्यांनी खरेदी केलेल्या पावसाळी साहित्य उदा. छत्री, रेनकोट व गमबुट यांच्या खर्चाची प्रतिपूर्ती देण्याबाबत.

संकलीत सामान्य आदेश क्रमांक १ दिनांक ३१.१०.७२ नुसार मंडळातील वेतनगट ३ व ४ मधील खालील पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे पावसाळी साहित्य देय आहे.

| | |
|---|---|
| वाहनचालक, पहारेकरी, पहारेकरी-नि-शिपाई, मुकादम, मजदूर | रेनकोट व टोपी (३ वर्षातून एकदा) |
| पहारेकरी | गमबूट (४ वर्षातून एकदा) |
| नाईक, शिपाई, सफाईगार, सफाईगार नि हमाल, वरिष्ठ खानसामा, मशिनचालक, मदतनीस, हमाल | छत्री (दोन वर्षातून एकदा) |

संकलित सामान्य आदेश क्रमांक १ दिनांक ३१.१०.७२ चे परिशिष्ट 'अ' अनुसार सचिव यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार त्यांनी १९९९-२००२ या गटवर्षासाठी वेतनगट ३ व ४ मधील पात्र कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या छत्री, रेनकोट व गमबूट हे पावसाळी साहित्य मंडळाने खरेदी करुन पुरविण्याऐवजी, कर्मचाऱ्यांनी खरेदी करावे व निम्ननिर्देशित दराने केलेल्या कमाल किंवा प्रत्यक्ष यातील किमान खर्चाची प्रतिपूर्ती देण्यास मान्यता दिली आहे.

| | |
|---|---|
| १) पुरुषांची छत्री | रु. १५०/- पर्यंत |
| २) स्त्रियांची छत्री | रु. १४०/- पर्यंत |
| ३) रेनकोट | रु. ३५०/- पर्यंत |
| ४) गमबूट | रु. ३००/- पर्यंत |

उपर्युक्त तरतुदीप्रमाणे पात्र कर्मचारी म्हणजेच वाहनचालक, नाईक, मुकादम, पहारेकरी, शिपाई, मजदूर, सफाईगार, सफाईगार नि हमाल, वरिष्ठ खानसामा, मशिन चालक (Roneo Operator) यांनी पावसाळी साहित्य स्वतः खरेदी करुन प्रतिपूर्तीसाठी त्यांची देयके सादर

मुख्य कार्यालयातील सर्व विभागप्रमुख/कक्ष प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील पात्र कर्मचाऱ्यांना उपर्युक्त तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेल्या वरील पावसाळी साहित्य खरेदी करण्यास सांगावे. तसेच खरेदी केल्याची देयके (कॅश मेमो) हे परिपत्रक प्रसृत झाल्याच्या दिनांकापासून २ (दोन) महिन्याच्या आत विभाग/कक्ष प्रमुखांमार्फत सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य), धारावी यांजकडे केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी सादर करण्यास सांगावे.

संचालक (कर्मचारीवर्ग)

प्राति,
मुख्य कार्यालयातील सर्व कक्ष प्रमुखांपर्यंत.